कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच क्र. ६ च्या सुधारीकरणास व आधुनिकीकरणासाठी महानिर्मिती कंपनी मर्यादित यांना प्राप्त झालेल्या कर्जाच्या रक्कमेच्या समायोजनाबाबत वित्तीय वर्ष २०१७-१८

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. निधिवि-२०१७/प्र.क्र.-११२/(१)/ऊर्जा-३
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३१ मार्च ,२०१८

संदर्भ :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग,क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दि. १८/४/२०१७
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.०८/०८/ २०१७
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. ०६ फेब्रुवारी २०१८
५) महानिर्मिती कंपनीचे पत्र क्र. DOF/MSPGCL/GOM/No. १४७०५, दि. १५.१२.२०१७

प्रस्तावना :-

कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच क्र. ६ (सुधारीकरण व आधुनिकीकरण) जागतिक बँकेच्या सहकार्याने उभारण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०१७-१८ या वर्षाकरिता रु. ८० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. जागतिक बँकेकडून सन २०१७-१८ मध्ये कर्ज रुपाने रु. २०,३३,७७,४५७/- (वीस कोटी तेहतीस लाख सत्याहत्तर चारशे सत्तावन्न फक्त) इतकी रक्कम थेट प्रकल्प राबविणाऱ्या कंपनीस प्राप्त झाली आहे. व रु.९६,१६,०००/- (रुपये श्याहण्णव लाख सोळा हजार फक्त) इतकी रक्कम राज्याच्या एकत्रित निधीत जमा झालेली आहे. राज्याच्या एकत्रित निधीत जमा झालेली रक्कम पुस्तकी समायोजनाने योग्य त्या लेखाशिर्षा खाली दर्शविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महानिर्मिती कंपनीच्या कोराडी युनिट क्र. ६ (आधुनिकीकरण व नुतनीकरण) प्रकल्पास केंद्र शासनाच्या पुढाकाराने जागतिक बँकेकडून मंजूर झालेल्या कर्जाची राज्य शासनाच्या खात्यात जमा झालेली रक्कम रु.९६,१६,०००/- (रुपये श्याहण्णव लाख सोळा हजार फक्त) इतकी रक्कम पुस्तकी समायोजनाने वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली कर्जाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. वरील बाबींचा खर्च “मागणी क्र. के-११, ६८०१ वीज प्रकल्पासाठी कर्जे, २०५ पारेषण व वितरण, (००) (००) (०५) कोराडी ऊर्जा प्रकल्पासाठी महानिर्मिती कंपनीस कर्जे (६८०१०६४७) ५५ कर्जे व आगाऊ रक्कमा” या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदी मधून समायोजित करण्यात यावा.

४. वरील मंजूर झालेल्या कर्जाची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित यांना रोख न देता पुढे दर्शविल्याप्रमाणे महानिर्मिती कंपनीकडून शासनास येणे असलेल्या रक्कमेपोटी वसुल करण्यात यावी. आणि खाली नमुद केलेल्या जमा लेखाशिर्षाखाली समायोजनाद्वारे समायोजित करण्यात यावी.

अ.क्र.	तपशिल	रक्कम रुपये	जमालेखाशिर्ष
१	वित्तीय वर्ष २०१७-१८ या वर्षातील जागतिक बँकेच्या कर्जाच्या रक्कमेपोटी समायोजित करावयाची रक्कम	९६,१६,०००/-	०८०१ वीज २२(०१) इतर जमा रक्कमा महाराष्ट्र राज्य वीज मंडळांकडून मिळणारी भाडेपट्टीची रक्कम (०८०१०१६३)
	एकूण	९६,१६,०००/-	

५. शासनास उपरोक्त प्रमाणे येणे असलेली रक्कम रु.९६,१६,०००/-समायोजित केल्यानंतर निरंक रकमेचे देयक अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयास सादर करावे.

६. सदर देयकाच्या समायोजनासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव,श्री वि.म.राजुरकर व नियंत्रण अधिकारी म्हणुन सह सचिव, श्री अ.मा. आत्राम यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

७. महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१७/ परिपत्रक क्र. अर्थसंकल्प, २०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ या परिच्छेदांची पूर्तता होत आहे व परिशिष्ट मधील सर्व १ ते १० अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच दि. ६.०२.२०१८ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. २ नुसार या लेखाशिर्षाखाली होणारा खर्च ८० % च्या मर्यादेत आहे.

८. वित्त विभागाच्या दि. १८.०४.२०१७ च्या परिपत्रकान्वये मासिक विवरण पत्रानुसारचा निधी जून ते डिसेंबर या कालावधीमध्ये पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा दिली आहे. सदर परिपत्रकान्वे निधी वितरणाचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात आले आहेत त्यास अनुसरुन सदर निधी वितरीत करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०३३१२०२८५३०११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vilas Mahadeorao Rajurkar

Digitally signed by Vilas Mahadeorao Rajurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=83469494bac86099a320f3e14bf8421ee9d2b48e344470b76ea2595df04951b4, serialNumber=02c5c00269dd48836be0d9939bdff848a9ff1f1a9fd195baf3a104d09b0817d9, cn=Vilas Mahadeorao Rajurkar
Date: 2018.03.31 20:29:08 +05'30'

(वि.म.राजुरकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत -:

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं.म.प्रकाशगड,वांद्रे (पूर्व),मुंबई-५१

२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विदयुत सुत्रधारी कंपनी मर्यादित, हाँगकाँग बिल्डींग , ४था मजला .एम ,जी,रोड . फोर्ट, मुंबई-२३

३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.

४) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपूर.

६) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/ विधान सभा, विधानभवन, मुंबई

७) उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

८) मुख्य अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय जल विद्युत प्रकल्प, एच.एस.बी.सी. इमारत, चौथा मजला, एम.जी. रोड, फोर्ट, मुंबई ४००० ०१

८) अधिदान व लेखा अधिकारी, (अराप / रालेवि-१), मुंबई.

९) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

१०) वित्त विभाग, /(अर्थसंकल्प-१३ / साधनसंपत्ती /साऊ / व्य-१६) मंत्रालय, मुंबई, ३२

११) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.